गावो रक्षति रक्षितः
महाराष्ट्र शासन

महाराष्ट्र शासन
Government of Maharashtra
महाराष्ट्र गोसेवा आयोग
Maharashtra Goseva Ayog
पशुसंवर्धन आयुक्तालय Animal Husbandry Commissionerate
१ ला मजला, स्पायसर कॉलेजच्या समोर, औंध-खडकी रोड, औंध, पुणे - ४११०६७ 1st Floor, Opposite Spicer College, Aundh-Khadki Road, Aundh, Pune - 411067.
ई-मेल- mhgosevaayog@gmail.com कार्यालय फोन नं.- ०२० २९९५२६६५/२९९५०९०९

महाराष्ट्र शासन

---

जा. क्र. मगोसेआ / परीपोषण योजना/ प्र.क्र.६१ (भाग १) /१०५३/२०२५ पुणे-६७ दि. ०१/०७/२०२५

## जाहीर आवाहन

**विषय :- जिल्ह्यातील गोसेवा आयोगाकडील नोंदणीकृत गोशाळांमधील देशी गायींच्या पालनपोषणासाठी प्रति दिन प्रती पशू रु. ५०/- अनुदान योजना अंतर्गत ऑनलाइन अर्ज सादर करणे करीता दि. १०/०७/२०२५ रोजी पर्यन्त द्वितीय मुदतवाढ बाबत..**

उपरोक्त विषयास अनुसरून शासन निर्णय पविआ- ११२४/प्र.क्र. १८४/ पदुम-३ मुंबई-३२ दि. ०८/१०/२०२४ नुसार गोशाळांना आर्थिक दृष्ट्या सक्षम करणे करिता सन २०२४-२५ पासून गोशाळेत ठेवण्यात येणाऱ्या देशी गायींना रु. ५०/- प्रति दिन प्रति गोवंश अनुदान देण्यासाठी योजना राबविण्यास मान्यता प्राप्त आहे. सदर योजने अंतर्गत अनुदान पात्रतेच्या अटी नुसार जिल्ह्यातील गोसंगोपनाचा किमान ३ वर्ष अनुभव असलेल्या, गोशाळेत किमान ५० गोवंश व संस्थेतील ईयर टॅगिंग (भारत पशुधन प्रणालीवर) असलेले तसेच गोसेवा आयोगाकडील नोंदणीकृत गोशाळा, गोसदन, पांजरपोळ व गोरक्षण संस्थांमधील देशी गाई अनुदानास पात्र आहेत. **सदर योजने अंतर्गत काही अपरिहार्य कारणामुळे अर्ज न करू शकलेल्या गोशाळांना सूचित करण्यात येते की, सदर योजने अंतर्गत ऑनलाईन अर्ज करण्याची मुदत दि. १०/०७/२०२५ पर्यन्त वाढविण्यात येत आहे.**

सदर योजने अंतर्गत दि. ३०/०६/२०२५ अखेर गोसेवा आयोगास प्राप्त ऑनलाईन अर्जांपैकी **५१९** अर्ज प्राथमिक तपासणी अंती पात्र आहेत व सदर अर्ज संबंधित जिल्ह्याच्या जिल्हा पशुसंवर्धन उपायुक्त यांच्या लॉगिन आय डी मध्ये पडताळणी करीता उपलब्ध करून देण्यात आले आहेत. प्राप्त अर्जांपैकी एकूण ८५ अर्जामध्ये त्रुटि आढळून आलेल्या आहेत. सदर त्रुटि असलेल्या गोशाळांची यादी https://schemes.mahagosevaayog.org या संकेतस्थळावरील "त्रुटि असलेले अर्ज" या मेनू वर संबंधित गोशाळा द्वारा ऑनलाईन त्रुटी पूर्तते करिता उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे व संबंधित गोशाळांना SMS, दूरध्वनीद्वारे सुद्धा सूचित करण्यात आले आहे.

सदर यादीमधील नमूद त्रुटींची पूर्तता तसेच नव्याने अर्ज योजनेच्या सुधारित विहित कालावधीनुसार **दि. १०/०७/२०२५** पूर्वी कोणत्याही परिस्थितीत ऑनलाईन पद्धतीने करण्यात यावेत.

(शेखर मुंदडा)
अध्यक्ष
महाराष्ट्र गोसेवा आयोग, औंध, पुणे-६७